| | |
|---|---|
| MHST-1400-1037-2026 | खटला दाखल दिनांक– ०८.०५.२०२६<br>खटला नोंदणी दिनांक– ०८.०५.२०२६<br>खटला निकाल दिनांक – ०८.०६.२०२६<br>निकालाचा अवधी – **०० व.०१ म.०० दि.** |

**फलटण येथील ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी– श्रीमती पी. एस. मुळे)**

(घोषीत दिनांक ०८/०६/२०२६)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२७५/२०२६** **निशाणी क्र.१८**

गु.र.नं.६०/२०२६
लोणंद पोलिस स्टेशन, ता.खंडाळा, जि.सातारा

| | |
|---|---|
| **सरकार पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>लोणंद पोलिस स्टेशन, ता.खंडाळा,<br>जि.सातारा |
| सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती एस. ए. मोरे |
| **आरोपी** | **संजय भगवान मेटकरी**<br>वय – ५५ वर्षे, व्यवसाय – मजुरी<br>रा.महुद, ता.सांगोला, जि.सोलापूर,<br>सध्या रा.बडेखान, तडवळे, ता.फलटण<br>जि.सातारा |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री. जे.एम.मेटकरी |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०१.०२.२०२६ |

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | ०१.०२.२०२६ |
| दोषारोपत्राचा दिनांक | ३१.०३.२०२६ |
| दोषारोपत्र ठेवल्याचा दिनांक | ०१.०६.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०८.०६.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | लागु नाही |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीचे श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधि–नियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संजय भगवान मेटकरी** | ०२.०२.२०२६ | ०५.०२.२०२६ | भा. न्या. सं. कलम ३०६ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | – | ०२.०२.२०२६ रोजी अटक करण्यात आली. दि.०४.०२.२०२६ पासून ते ०८.०६.२०२६ रोजी सदर आरोपी जेलमध्ये होता. |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव/**

**न्यायालयाचे साक्षीदार**

## अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | सत्यवान देवीदास जाधव (नि.१०) | फिर्यादी |
| २. | आबा गुलाब मोहिते (नि.१३) | घटनास्थळ पंच |
| ३. | दादासाहेब विश्वनाथ जाधव (नि.१५) | घटनास्थळ पंच |

## ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी

## अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र.११ (सा.क्र.१) | फिर्याद वरील फिर्यादीची सही |
| २. | नि.क्र.१२ (सा.क्र.१) | प्रथम खबरी अहवालावरील फिर्यादीची सही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | नि.क्र.१४ (सा.क्र.२) | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | नि.क्र.१६ (सा.क्र.३) | घटनास्थळ पंच सही |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.क्र.३ | दोषारोप |

**ड. मुद्देमाल**

| अ.नं. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**– न्यायनिर्णय –**

( घोषित दिनांक ०८/०६/२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहीता (या पुढे भा.न्या.सं. असे संबोधले जाईल) कलम ३०६ अन्वये दोषसिध्दीसाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथनः**

**२.** दि.०१.०२.२०२६ रोजी फिर्यादी सत्यवान देवीदास जाधव यांनी फिर्याद दिली की, तडवळे, बडेखान येथे त्यांची आई जनाबाई व वडील देविदास असे राहण्यास आहेत. बडेखान येथे त्यांचे घराचे शेजारी असलेली त्यांची वन रुम किचन त्यांनी आरोपी यास भाडयाने दिले असून तो त्याच्या शेतात हजेरीने काम करीत असतो. तसेच त्याला इतर ठिकाणी काम मिळाल्यावर तो तेथेही कामाला जातो. आरोपी त्यांचे घरात अधून मधून येत असतो. त्यांचे आई वडील राहत असलेल्या घराचे पुर्व दिशेला व उत्तर दिशेला असे

दोन दरवाजे असून त्यातील पुर्व दिशेचा दरवाजा आतून कडी लावली असता बाहेरुन ढकलला असता तो उघडतो हे आरोपीस माहित होते.

३. दि.३०.०१.२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजणेचे सुमारास आई आजारी असल्याने ते बडेखान येथील घराला कुलुप लावून आई वडीलांना फलटण येथे उपचारास घेवून गेले होते. त्याबाबत त्यांनी आरोपीस घरावर लक्ष ठेवणेकरीता सांगितले होते. दि.०१.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजणेचे सुमारास गारपिरवाडी येथे किर्तनासाठी गेले असताना त्यांना आरोप फोन करीत असलेबाबत एस.एम.एस. आला म्हणून त्यांनी आरोपीस फोन केला असता त्याने सांगितले की, त्यांचे घरात चोरी झाली आहे. त्यामुळे ते फलटणला जावून वडील देविदास यांना सोबत घेवून बडेखान येथे आले. त्यावेळी आरोपी याने त्याचे रुममध्ये त्यांना व वडीलांना सांगितले की,रुममधील पेटी कोणतरी चोरुन नेली आहे. परंतू, त्याच्या रुममध्ये चोरी झालेसारखे वाटत नव्हते व तो त्याचे मोटार सायकलवर त्याचा बिछाना घेवून पळून जाण्याच्या तयारीत वाटत होता. त्यानंतर वडीलांनी त्यांचे घराचे उत्तर बाजूच्या दरवाजाचे कुलुप उघडून आता जावून लाईट चालू केली असता घरातील लोखंडी पेटी उघडी दिसली व त्यातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. पुर्वेकडील दरवाजा पाहिला असता त्याची त्यांनी आतून लावलेली कडी उघडी होती व दरवाजाच्या बाहेरुन कडी लावलेली होती. त्यांनी पेटीतील डब्यात पाहिले असता त्यातील अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी तेथे नव्हती. त्यावेळी त्यांची खात्री झाली की, घराचे पुर्व बाजूचा दरवाजाला आतून कडी लावली तरी तो ढकलल्यावर उघडतो हे त्यांचेकडे काम करणारा व भाडयाने राहणारा आरोपी याला माहित होते. तसेच तो त्याचे साहित्य मोटारसायकलवर बांधून त्यांची सोन्याची अंगठी घेवून पळून जाण्याच्या तयारी होता. आरोपीकडे चौकशी केल्यावर तो चाचपटू लागला. त्यामुळे त्यांनी आरोपी विरुध्द पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

४. पोलिसांनी फिर्यादी यांचा जबाब नोंदविला. सदर जबाबाच्या अनुषंगाने

आरोपीविरुद्ध गुन्हा रजि.नं.६०/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम ३१६ (४) अन्वये नोंदवण्यात आला. तपासिक अंमलदार यांनी गुन्ह्याचे तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला आणि तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने भारतीय न्याय संहिताचे कलम ३१६ (४), ३०६ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ३०६ प्रमाणे नि.३ दोषारोप निश्चित केले व आरोपीस वाचुन दाखवले असता आरोपीने नि.४ कडे गुन्हा नाकबुल केला व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. म्हणून सदरचा खटला पुढे चालविण्यात आला.

६. आरोपीविरुध्द आरोप सदृश्य पुरावा आल्याने आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नि.१७ घेण्यात आला.

७. सदर सरकार पक्षातर्फे श्रीमती एस. ए. मोरे अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला. आरोपीतर्फे वकील श्री. जे. एम. मेटकरी यांनी युक्तीवाद केला.

८. अभियोग पक्षाचे म्हणणे व पुरावा यावरुन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष माझे विश्लेषणासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि.३०.०१.२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजणेचे सुमारास ते दि.०१.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेचे पुर्वी पर्यंत मौजे बडेखान ता.फलटण जि.सातारा गावचे हद्दीत आरोपी हा फिर्यादीचा नोकर असून त्याने फिर्यादीच्या घराचा दरवाजा उघडून लोखंडी पेटीमध्ये ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातील अर्धा तोळा वजनाची सोन्याची र.रु.५०,०००/- ची अंगठी अप्रामाणिकपणे चोरुन नेली त्यायोगे त्याने भारतीय न्याय संहिताचे कलम ३०६ प्रमाणे गुन्हा | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | केला काय ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

## का र ण मिं मा सा

**मुद्दा क्र.१ करीता :–**

९. आरोपी हा फिर्यादीचा नोकर असून त्याने फिर्यादीच्या घराचा दरवाजा उघडून लोखंडी पेटीमध्ये ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातील अर्धा तोळा वजनाची सोन्याची र.रु.५०,०००/– ची अंगठी चोरुन नेली ही बाब अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, वरील कलमांचे प्रमुख घटक आरोपीविरुध्द सिध्द् करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे.

१०. साक्षीदार क्र.१ फिर्यादी सत्यवान देवीदास जाधव (नि.१०) यांच्या पुराव्यात असे आले की, दि.०१.०२.२०२६ रोजी त्यांचे काल्याचे गारपिरवाडी येथे किर्तन होते. किर्तन झाल्यानंतर त्यांना फोन आला की, त्यांच्या घरी चोरी झाली आहे. त्यांनी तेथे जावून शहानिशा केली असता घराच्या उत्तरेकडील दरवाजाचे कुलुप तोडलेले होते. घरातील ट्रंक व काही साडया अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. त्याचप्रमाणे ट्रंकमध्ये असेलली अर्धा तोळयाची अंगठी चोरीला गेली असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती. त्यांनी फिर्याद मधील मजकूर नाकारुन त्यावरील त्यांची सही मान्य केली.

११. सदर साक्षीदाराने फिर्यादमधील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास साथ देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या

परवानगीने उलटतपासात विचारले जाणारे सुचक प्रश्न विचारले असता, अभियोग पक्षास पुरक साध्य झाले नाही.

१२. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला असता त्यात त्यांनी मान्य केले की, त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. सदरची साक्ष त्यांनी स्वेच्छेने दिलेली असून त्यांच्यावर साक्ष देण्याकरीता कोणीही दबाव आणलेला नाही. त्यांना सदरची केस चालवायची नसून आणखी साक्षीदार द्यायचे नाहीत. ते तक्रार देण्याकरीता पोलिस स्टेशनला गेले त्यावेळी पोलिसांना त्यांनी आरोपीने चोरी केली आहे असे सांगितले नव्हते. त्यांचे फिर्यादमध्ये आरोपीचे नाव कसे आले हे त्यांना माहित नसल्याचे कथन केले.

१३. साक्षीदार क्र.२ आबा गुलाब मोहिते (नि.१३) हे घटनास्थळ पंच असून त्यांच्या साक्षीत असे आले की, दि.०२.०२.२०२६ रोजी त्यांना पोलिसांनी बडेखान येथे पंचनाम्याकरीता बोलावले होते. त्यावेळी तेथे फिर्यादी हजर होते. सदर ठिकाणी पोलिसांनी तपासणी केली. तेथे पेटी व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. सदरचे घटनास्थळ फलटण लोणंद रस्त्याच्या दक्षिणेला होते. सदरचा पंचनामा ०२.०० ते ०२.३० वाजणेचे सुमारास झाला होता. घटनास्थळ पंचनाम्यास नि.१४ देण्यात आली.

१४. आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यात त्यांनी असे कथन केले की, फिर्यादी हे त्यांचे ओळखीचे असून त्यांनी फिर्यादीच्या सांगण्यावरुन पोलिस स्टेशनला पंचनाम्यावर सहया केल्या आहेत. पोलिसांनी पंचनामा अगोदरच तयार केला होता व पोलिसांनी सांगितले म्हणून त्यांनी पंचनाम्यावर सही केली तसेच पंचनाम्यातील मजकूर त्यांना वाचून दाखवला नव्हता व त्यांनीही वाचला नसल्याचे कथन केले.

१५. अभियोगपक्षाने घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.३ दादासाहेब विश्वनाथ जाधव (नि.१५) यांना तपासले. परंतू, त्यांनी अभियोगपक्षास साथ दिलेली नाही. सदर साक्षीदाराने त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोगपक्षास साथ देत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपास घेतला

असता अभियोगपक्षास पुरक साध्य झाले नाही. आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेतला असता त्यांनी कथन केले की, त्यांची व दुस–या पंचाची सही पोलिस स्टेशनला घेतली होती. पोलिसांनी पंचनामयातील मजकूर वाचून दाखविला नव्हता व त्यांनीही वाचला नव्हता.

**१६.** अभिलेखावरील पुराव्याचे विवेचन करता असे दिसून येते की, फिर्यादी हे त्यांच्या फिर्यादीप्रमाणे सांगत नाही. त्यामुळे सदर गुन्हयाची फिर्याद भारतीय साक्ष अधिनियमाप्रमाणे सिद्ध झालेली नाही. फिर्यादी यांच्या पुराव्यात असे कुठेही आले नाही की, आरोपी हा फिर्यादीचा नोकर असून त्याने फिर्यादीच्या घराचा दरवाजा उघडून लोखंडी पेटीमध्ये ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातील अर्धा तोळा वजनाची सोन्याची र.रु.५०,०००/– अंगठीची चोरी केली. तसेच पंच साक्षीदारांच्या पुराव्यावरुन घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नाही. अभियोगपक्षाने इतर साक्षीदार व तपासी अंमलदार यांना तपासलेले नाही. सदर प्रकरणात आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे खरोखरच आरोपीने सोन्याच्या अंगठीची चोरी केली होती याबाबत संशय निर्माण होतो. अभिलेखावर असलेल्या पुराव्यावरुन सदर गुन्हयाचा व आरोपीचा काय संबंध होता ही बाब स्पष्ट झालेली नाही.

**१७.** फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात सांगितले की, त्यांची आजरोजी आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे त्यांना सदरची केस पुढे चालवायचे नाही व आणखी साक्षीदार तपासायचे नाही. अभिलेखावर असलेला एकूण पुरावा आरोपीस शासन करण्यास पुरेसा नाही. म्हणून मुद्दा क्र.१ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी संजय भगवान मेटकरी रा.महुद, ता.सांगोला, जि.सोलापूर, सध्या रा.बडेखान, तडवळे, ता.फलटण जि.सातारा यांना भारतीय नागरिक सुरक्षा

सहिता, २०२३ कलम २७१ (१) अन्वये भारतीय न्याय संहिताचे कलम ३०६ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्त करत आहे.

**२.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम ४८१ अन्वये रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन द्यावा.

**३.** आरोपीची ताबडतोब मुक्तता करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

PRATIBHA SAGAR MULE
Digitally signed by PRATIBHA SAGAR MULE
Date: 2026.06.08 17:06:14 +0530

फलटण ( पी.एस.मुळे)

दि. ०८/०६/२०२६ ५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण